रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## शिष्यवृत्ती नोटीस (Re-apply Application ) - २०२२-२०२३

## शिष्यवृत्ती नोटीस ( New & Re-apply Application ) - २०२३-२०२४

## अंतीम मुदत ३१.०३.२०२४

दि.२८.०२.२०२४

सन २०२२-२३ आणि सन २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या ज्युनिअर (ज्युनिअर इंग्रजी मेडीअम सोडून ) व सिनिअर वर्गातील सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सन २०२३-२४ या वर्षातील **महाडीबीटी वेबसाईटवर शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी व सन २०२२-२३ मधील दुरुस्तीसाठी विद्यार्थी लॉगीनला पाठविलेले अर्ज Re-apply करण्याची अंतीम मुदत ३१/०३/२०२४ ही आहे.** विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर महाडीबीटी वेबसाईटवर शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरुन महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागात नोटीस वाचून सर्व कागदपत्र जोडून जमा करावा.

**दिलेल्या मुदतीत जे विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज भरणार नाही किंवा दुरुस्तीसाठी पाठविलेले अर्ज Re-apply करणार नाही अशा विद्यार्थ्यांना पेईंग फी प्रमाणे फी भरावी लागेल यामुळे संबंधीत विद्यार्थ्याच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**तसेच ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप अर्ज भरुन महाविद्यालयात जमा केलेले आहे अशा विद्यार्थ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Login/ या वेबसाईटवर स्वतःचा अर्ज लॉगीन करुन अर्ज मंजुर झाल्याची खात्री करुन घ्यावी.**

**सन २०२२-२३ मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती किंवा फ्रि-शिप अर्ज दुरुस्तीसाठी विद्यार्थी लॉगीनला पाठविलेले आहे अशा विद्यार्थ्यांना दि. ३१/०३/२०२४ ही अंतीम दिनांक आहे त्यामुळे दि. ३१/०३/२०२४ नंतर सन २०२२-२३ मधील अर्ज Re-apply होणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. त्यामुळे शासनाने दिलेल्या मुदतीतच अर्ज Re-apply करुन महाविद्यालयात समक्ष येऊन माहिती द्यावी.**

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर.

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.
www.cdjcollege.com